सत्यमेव जयते

# क्षेत्र अधिकाऱ्यासाठी निदेश पुस्तीका

## काय करावे आणि काय करू नये

## २०२३-२४

## भारत निवडणूक आयोग

आवृत्ती १ जुलै, २०२३

## अनुक्रमणिका


| परिच्छेद क्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण कार्ये आणि जबाबदाऱ्या . . . . . . . . | १ |
| २ | मतदानपूर्व जबाबदारी - मतदानाच्या ठिकाणाविषयी . . . . . . | २ |
| ३ | मतदानपूर्व जबाबदारी - मतदारांविषयी . . . . . . | ३ |
| ४ | मतदानपूर्व जबाबदारी - असुरक्षित क्षेत्रांचे निर्धारण . . . . . . | ४ |
| ५ | मतदान पूर्वसंध्येची जबाबदारी . . . . . . . . | ५ |
| ६ | मतदानाच्या दिवसाची जबाबदारी . . . . . . . . | ६ |
| ७ | मतदान झाल्यानंतरची जबाबदारी . . . . . . . . | ८ |
| ८ | क्षेत्र अधिकाऱ्याकडे उपलब्ध असलेली माहिती आणि सुविधा . . . . | ९ |
| ९ | क्षेत्र अधिकाऱ्याला पुरविण्यात आलेले साहित्य . . . . . | ९ |
| १० | क्षेत्र अधिकाऱ्याकडून सादर केले जाणारे अहवाल . . . . . . | ९ |

# काय करावे

आणि

# काय करू नये

## क्षेत्र अधिकाऱ्यासाठी

आवृत्ती १, जुलै २०२३

## सर्वसाधारण कार्ये आणि जबाबदाऱ्या

| ☑ १.१ काय करावे | ☒ १.२ काय करू नये |
|---|---|
| १. मतदानाच्या किमान ७ दिवसापूर्वी तुम्हाला पदनिर्देशित क्षेत्रासाठी क्षेत्रीय दंडाधिकारी म्हणून पदनियुक्त केले असल्यास जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून अधिकारांचा वापर करा.<br>२. निवडणुकीशी संबंधित क्षेत्राचे प्रदेशज्ञान, आणि मार्ग यांची पुरेशा अगोदरच चांगल्याप्रकारे माहिती करून घ्यावी.<br>३. नियुक्ती झाल्यानंतर लगेचच क्षेत्राचा नकाशा सोबत ठेवावा.<br>४. जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी आणि निरीक्षक यांनी वारंवार (साप्ताहिक) क्षेत्र अधिकाऱ्यासोबत आढावा बैठकी घ्याव्यात आणि त्यांना नेमून दिलेल्या व त्यांनी केलेल्या कामांचे संनियंत्रण करावे.<br>५. जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीच्या अधिसूचनेच्या एका आठवड्यापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत क्षेत्र अधिकाऱ्याला अगोदरच वाहन द्यावे. वाहनाच्या पुढच्या व मागच्या काचेवर निवडणुकीचे चिन्ह स्पष्टपणे लावलेले असेल.<br>६. संप्रेषण योजनेच्या प्रभावी कार्यान्वयनाची खात्री करा.<br>७. विहित अहवाल वेळेवर सादर होत असल्याची खात्री करा. | १. जिल्हा प्रशासनाने पुरविलेल्या वाहनाखेरीज इतर कोणतेही वाहन वापरू नये.<br>२. बैठका टाळू नये.<br>३. वेळेत अहवाल सादर करण्यास विसरू नये. |

(शा.म.मु.) वाय १७८६—२ (७,३५०—१-२०२४)

## मतदानापूर्वीची जबाबदारी - मतदानाच्या ठिकाणाविषयी

| ☑ २.१ काय करावे | ☒ २.२ काय करू नये |
|---|---|
| १. मार्ग नकाशा पडताळून पहावा (मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आणि तेथेपर्यंत पोहचण्याची सुगमता) आणि आवश्यकता वाटल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्यातील बदल सूचवावा. | १. मतदान स्थळांना स्वतः भेट दिल्याशिवाय मतदानाच्या स्थळांच्या मार्गाचा नकाशाला अंतिम रुप देऊ नये. |
| २. मतदान केंद्रावर पायाभूत सुविधा आणि आश्वासित किमान सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करून घ्यावी उदा. पाणी, छत, चढ-उतार करण्यासाठी जिना, शौचालय, दूरध्वनी, वीज इत्यादी आणि इमारतीची प्रत्यक्ष स्थिती. | २. प्रत्यक्ष पडताळणी आणि स्वतःचे समाधान झाल्याशिवाय मतदान केंद्राच्या पायाभूत सुविधा आणि आश्वासित किमान सुविधा यावरील तपशीलाचा अहवाल देऊ नका. |
| ३. नवीन मतदान केंद्र एकदा त्यांना अधिसूचित केल्यानंतर त्याची मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी होईल याची सुनिश्चिती करा. | ३. नवीन मतदान केंद्रांची व्यापक प्रसिद्धी करण्याची खात्री करण्यास विसरू नका. |
| ४. मतदान केंद्राध्यक्ष इत्यादींचे दूरध्वनी क्रमांक घ्या आणि मतदान केंद्राच्या ठिकाणी भ्रमणध्वनी संपर्कजाळे असल्याची खात्री करून घ्यावी. | ४. आदर्श आचार संहितेच्या कोणत्याही उल्लंघना-बाबत कळविण्यात विसरू नका. |
| ५. मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या परिघात पक्ष कार्यालये अस्तित्वात आहेत का ते तपासा. | |
| ६. अनधिकृत प्रचार वाहनांची ये-जा, मालमत्तेचे विरूपण, अनधिकृत प्रचार, सार्वजनिक/शासकीय इमारती, वाहने/शासकीय कर्मचारी यांचा गैरवापर आणि आदर्श आचार संहितेचा भंग होण्याच्या सर्व शक्यता यांवर लक्ष ठेवा आणि त्याबाबत कळवा. | |
| ७. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या संपूर्ण देखरेखीखाली मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडून प्रपत्र १२घ चे वितरण आणि संकलन करण्याच्या प्रक्रियेचे पर्यवेक्षण करा. | |

## मतदानापूर्वीची जबाबदारी - मतदारांविषयी

| ☑ ३.१ काय करावे | ☒ ३.२ काय करू नये |
| --- | --- |
| १. मतदारांना मतदार यादीत त्यांचे स्वतःचे नाव नोंदवण्याच्या मुदतमर्यादेबद्दल माहिती द्या.<br><br>२. मतदार छायाचित्र ओळखपत्र प्राप्त करण्याच्या कार्यक्रमाविषयी मतदारांना विशिष्ट माहिती द्या.<br><br>३. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत मतदार यादीमध्ये मतदारांना त्यांच्या नावाची नोंद आहे का हे तपासण्याची सूचना द्या.<br><br>४. तुमच्या सर्व मतदान केंद्रांचा समावेश करून सभोवतालच्या क्षेत्रांतील मतदारांना ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक दाखविले आहे याची खात्री करा.<br><br>५. मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राच्या मदत क्रमांकाच्या उपलब्धतेविषयी आणि स्थानाबाबत माहिती द्या.<br><br>६. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मतदार माहिती चिठ्ठीच्या वितरणाचे काम मतदानाच्या दिनांकाच्या किमान पूर्ण पाच दिवसाआधी पुर्ण केले आहे याची खात्री करा.<br><br>७. वितरित न केलेल्या सर्व मतदार माहिती चिठ्ठ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे परत पाठविल्या आहेत याची खात्री करा जो त्या सुरक्षा अभिरक्षेत  मोहोरबंद पाकिटात ठेवेल.<br><br>८. मतदार माहिती चिठ्ठ्या मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे परत केल्यानंतर त्यांचे यापुढे वितरण होणार नाही याची खात्री करा. | १. तुम्हाला नेमून दिलेल्या मतदान ठिकाणे/केंद्रे यांच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना भेटायला विसरू नका.<br><br>२. कोणत्याही उमेदवाराशी किंवा राजकीय पक्षांशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला भेटू नका किंवा त्यांचे आदरातिथ्य स्वीकारू नका. |

## मतदानपूर्व जबाबदारी - असुरक्षित क्षेत्रांचे निर्धारण

| ☑ ४.१ काय करावे | ☒ ४.२ काय करू नये |
|---|---|
| १. धमक्या आणि धाकदपटशा यामुळे असुरक्षित असलेल्या मतदारांची गावे, पाडे, प्रभाग आणि क्षेत्र निश्चित करा.<br>२. वारंवार भेटा आणि आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपोययोजना करण्यासाठी लोकांना आणि त्यांच्याशी विस्तृत चर्चा केल्याबद्दल आणि गुप्तवार्ता गोळा करून असुरक्षित क्षेत्रे निर्धारित केली आहेत याची खात्री करा.—<br>३. असुक्षिततेस जबाबदार असलेल्या व्यक्तीची ओळख पटविली आहे आणि त्यांच्याबाबत प्रत्येक ठिकाणासाठी/क्षेत्रासाठी असलेल्या विहित नमुन्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना स्वतंत्रपणे माहिती देण्यात आली आहे याची सुनिश्चिती करा.<br>४. असुरक्षित समुदायामध्ये त्यांचा दूरध्वनी क्रमांक घेऊन संपर्काचे ठिकाण स्थापित करा.<br>५. मतदानासाठी मतदारांना मुक्त प्रवेश मिळेल याची खात्री करा.<br>६. मतदान केंद्रांच्या रेखाटलेल्या नकाशा असलेला आराखडा निवडणुकीशी संबंधित अधिकारी, त्यांचे संपर्क क्रमांक आपत्कालीन सेवा यांची यादी जवळ ठेवा. | १. राजकीय पक्ष आणि प्रसार माध्यमातील व्यक्तींशी संवाद साधू नका.<br>२. निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, आणि निरीक्षक वगळता इतर कोणाकडेही कोणतीही माहिती उघड करू नका. |

## मतदान पूर्वसंध्येची जबाबदारी

### ☑ ५.१ काय करावे

१. मतदानाच्या दिवशी बदलण्यासाठी राखीव ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपीएटी) आणि नियंत्रण युनिट आणि मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी यांचे अतिरिक्त पॉवर पॅक घेऊन ठेवा.

२. राखीव मतदान युनिट (बीयु) (टे), नियंत्रण युनिट (टे) (सीयु), आणि (मतदार पडताळणी योग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपीएटी) यांच्या विशिष्ट (युनिक आयडी) ओळख क्रमांकाची नोंद करा.

३. वितरण करण्याच्या/मतदानाच्या दिवशी राखीव ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हिव्हीपीएटी) असलेल्या वाहनांच्या समोरच्या काचेवर (विंड-स्क्रीन) आणि मागच्या काचेवर “कर्तव्यार्थ क्षेत्र अधिकारी क्षेत्रीय दंडाधिकारी” असे लिहिलेले पृष्ठ चिकटवावे.

४. मतदान दिवस-३/मतदान दिवस-२/मतदान दिवस-१ यादिवशी ईलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रे व व्हिव्हिपीएटी यांची ने-आण करावयाची असल्यास, ती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे राखून ठेवलेल्या मध्यवर्ती सुरक्षित कक्षामध्येच ठेवावी.

५. मतदान पथक आणि सर्व साहित्य त्यांच्या संबंधित मतदान केंद्रांवर पोहचल्याची खात्री करा.

६. तैनाती बाबतच्या योजनेनुसार संबंधित मतदान केंद्रावर सेनाबल पोहोचले असल्याची खात्री करा.

७. मतदान कर्मचारीवर्गामध्ये ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र चालविण्याबाबत किंवा मतदान प्रक्रियेबाबत शेवटच्या क्षणापर्यंत कोणतीही शंका आल्यास दूर करणे.

८. मतदान पथकाच्या सुचनेनुसार मतदान कक्ष (बूथ) उभारले आहे का ते तपासा.

९. मतदान केंद्रावर मतदार सहायक केंद्र स्थापन केले आहे का आणि माहितीचे फलक प्रदर्शित केले आहे का त्याची शहानिशा करा.

१०.पूर्ण समाधान झाल्यानंतरच नियंत्रण कक्षाला “सर्व काही ठिक आहे” असा अहवाल द्यावा.

### ☒ ५.२ काय करु नये

१. हॉटेल, घर इत्यादींसारख्या कोणत्याही खाजगी ठिकाणी राहू नका. नेहमी नेमून दिलेल्या ठिकाणीच रहा.

२. वाहनाच्या पुढील आणि मागील बाजूस निवडणुकीचे स्पष्ट चिन्ह असेलेले पृष्ठ चिकटविल्याशिवाय पुरविलेले वाहन/परिवहनाचा वापर करू नका.

३. कोणत्याही परिस्थितीत वाहनाजवळ कोणी उपस्थित (हजर) नसताना वाहने सोडून जाऊ नये.

४. तुम्हाला नेमून दिलेल्या वाहनात विहित चिन्ह चिकटविल्याशिवाय त्यात राखीव ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) आणि मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षक निशाणी (व्हिव्हिपीएटी) ठेवू नये.

५. प्रसार माध्यम/राजकीय पक्ष/उमेदवार यांच्याशी परस्पर संवाद साधू नका.

६. मतदान केंद्रावर मतदान पथक सुरक्षितपणे पोहोचल्यासंबंधिचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पाठवायला विसरू नये.

७. मतदान पथकाने मतदान कक्ष तयार केला आहे याबाबतचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला पाठवायचे विसरू नका.

# मतदानाच्या दिवसाची जबाबदारी

| ☑ ६.१ काय करावे | ☒ ६.२ काय करू नये |
|---|---|
| १. निवडणुकीच्या दिवशी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या वाहनामध्येच (राखीव) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) आणि व्हीव्हीपीएटी (मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी) ठेवा आणि वाहनासोबत सुरक्षा रक्षक असल्याची खात्री करा.<br>२. अभिरुप मतदान आणि प्रत्यक्ष मतदाना दरम्यान ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्हीव्हीपीएटी कार्य करत नसल्यास ते बदलून मिळतील याची खात्री करा.<br>३. ऊर्जा संच सदोष किंवा मंद झाल्याचे दाखवत असल्यास नियंत्रण युनिट आणि व्हिव्हीपीएटी चा ऊर्जा संचिका (पॉवर पॅक) बदलण्याची खात्री करा.<br>४. अभिरुप मतदान आणि प्रत्यक्ष मतदान या दरम्यान ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपीएटी बदलल्याचा अहवाल जोडपत्र-एक मधील प्रपत्रामध्ये (मतदान केंद्राध्यक्षांचे भाग चार आणि पाच अहवाल) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करा.<br>५. जेथे प्रतिनिधीच्या अनुपस्थित अभिरुप मतदान केले गेले होते त्या मतदान केंद्राला वारंवार भेट द्या आणि लक्ष ठेवा.<br>६. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कोणताही विलंब न करता मतदानास प्रारंभ केल्याचा अहवाल द्या.<br>७. मतदान केंद्रावर तैनात केलेली सुरक्षा बले सज्ज स्थितीत आहेत का त्याची खात्री करा.<br>८. मतदान प्रतिनिधींची उपस्थिती/अनुपस्थितीची माहिती घेत रहा आणि अहवाल द्या.<br>९. मतदान केंद्राच्या आत मतदान पथकास कामकाजामध्ये सहाय्य करा.<br>१०. मतदान प्रक्रियेचे पावित्र्य राखण्यासाठी मतदान केंद्रावर त्यांच्या भेटी दरम्यान मतदानाच्या सर्व पैलूची तपासणी करा.<br>११. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला ३० मिनिटात अभिरुप मतदानाचा अहवाल द्या.<br>१२. मतदानाचे स्वरुप तपासा आणि कोणत्याही प्रभाग/विभागात मतदान होत नसल्याचे ठळकपणे दिसून आल्यास त्याकरिता सुधारात्मक उपाययोजनेसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवा.<br>१३. अनुदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला वेळोवेळी झालेल्या मतदानाच्या टक्केवारीचा अहवाल द्या.<br>१४. असुरक्षित वसाहती/समुदाय येथील मतदार मतदानासाठी उपस्थित आहेत किंवा नाही हे पडताळा, येत नसतील, तर समर्पित पथक/सुरक्षादल पाठविण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांना कळवा. | १. वाहनामध्ये विहित स्टिकर असल्या खेरजी राखीव आणि अभिरुप मतदानात बदललेली ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी ठेवू नका.<br>२. प्रसार माध्यम/राजकीय पक्ष/उमेदवारांसोबत संवाद साधू नका.<br>३. निवडणूक निर्णय अधिकारी किंवा नियंत्रण कक्ष यांना, अभिरुप मतदान घेतल्याचा, मतदानाला सुरुवात झाल्याचा, दर २ तासांचा अहवाल, आणि मतदान बंद केल्याचा अहवाल वेळेत सादर करण्याचे विसरू नका.<br>४. निवडणूक निर्णय अधिकारी किंवा नियंत्रण कक्ष यांना कोणतीही अप्रिय घटना घडल्यास त्याविषयी सूचना कळविण्यास विसरू नका. |

## मतदानाच्या दिवसाची जबाबदारी

| ☑ ६.१ काय करावे | ☒ ६.२ काय करू नये |
|---|---|
| १५. ईलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रे (ईव्हीएम) मोहोरबंद केल्याचे आणि मतदान पथकांनी तयार केलेली कागदपत्रे तपासा. | |
| १६. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नेमून दिलेल्या मतदान कर्मचारीवर्गाला मानधनाचे वितरण केल्याची खात्री करा. | |
| १७. मतदानाच्या शेवटी याची खात्री करा की :— | |
| क. मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी योग्यरित्या भरली आहे. | |
| ख. नियंत्रण युनिटवरील ‘क्लोज’ बटन दाबल्यानंतर ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे यथोचितरीत्या मोहोरबंद केली आहे. | |
| ग. व्हीव्हीपीएटी मोहोरबंद करण्यापूर्वी व्हीव्हीपीएटी मधील ऊर्जा संचिका (पॉवर पॅक) काढणे. | |
| घ. मतदान प्रतिनिधींना १७ सी च्या प्रती दिल्या आहेत. | |
| ड. १७ ए ची नोंदवही योग्यरीत्या भरली आहे. | |

## मतदान झाल्यानंतरची जबाबदारी

### ☑ ७.१ काय करावे

१. नेमून दिलेल्या क्षेत्रातील सर्व मतदान पथके नेमून दिलेल्या वाहनातून संकलन केंद्रावर गेली आहेत आणि वाटेत कोणताही विलंब न करता/न थांबता वेळेवर संकलन केंद्रावर पोहोचले आहेत याची खात्री करा.

२. जर, ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे सोबत असलेल्या मतदान पथकासोबत संकलन केंद्रावर जाण्याची जबाबदारी सोपविली असल्यास, त्यांच्या सोबत जाणे.

३. राखीव आणि अभिरुप मतदानात कार्यान्वित न झालेले ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी यांच्या सोबत नियंत्रण युनिट व व्हीव्हीपीएटी चे शिल्लक ऊर्जा संच संकलन केंद्रात किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे निश्चित केलेल्या इतर ठिकाणी जमा करा.

४. राखीव आणि अभिरुप मतदानातील सदोष ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपीएटी जमा करण्यासंबंधात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री करा.

५. मतदानाच्या पहिल्या दिवशी ने-आण झाल्यास, ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपीएटी केवळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या मध्यवर्ती सुरक्षित कक्षामध्ये ठेवा आणि तेथे पोहचल्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या प्राप्ती केंद्रावर जमा करा.

६. मतदानानंतर, मतदानाचा अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करा.

७. केवळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून परवानगी मिळाल्यानंतर आणि त्याने योग्यरीत्या कार्यमुक्त केल्यानंतर संकलन केंद्रातून बाहेर पडा.

### ☒ ७.२ काय करू नये

१. नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटीचा शिल्लक ऊर्जा संच यांसह राखीव आणि अभिरुप मतदानाची कार्यान्वीत न झालेली ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी संकलन केंद्र किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या इतर ठिकाणी जमा करण्यास विसरू नका.

२. निवडणूक साहित्य घेऊन जाताना हॉटेल, घरी इत्यादी कोणत्याही खाजगी ठिकाणी राहू नका. नेहमी नियुक्त केलेल्या ठिकाणीच राहावे.

३. जोपर्यंत सर्व मतदान पथके नेमून दिलेल्या वाहनावरून जात नाही तोपर्यंत क्षेत्र सोडू नका.

४. जोपर्यंत सर्व मतदान पथके निवडणूक साहित्य आणि ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी जमा/संकलन केंद्रावर जमा करत नाही तोपर्यंत संकलन केंद्र सोडू नका.

## क्षेत्र अधिकाऱ्याकडे उपलब्ध असलेली माहिती आणि सुविधा

**☑ ८.१ काय करावे**

१. क्षेत्र अधिकाऱ्याने खात्री करून घ्यावी की त्यांना, विशेषतः ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, निवडणूक व्यवस्थापन, मतदान प्रक्रिया, आदर्श आचारसंहिता आणि निवडणुकीच्या इतर महत्त्वाच्या पैलूंबाबत पुरेसे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

२. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे जारी केलेले ओळखपत्र क्षेत्र अधिकाऱ्याकडे असले पाहिजे आणि ते क्षेत्र भेटी दरम्यान नेहमी त्यांचे ओळखपत्र दाखवतील याची खात्री केली पाहिजे.

३. क्षेत्र अधिकाऱ्याकडे त्याच्या अधिकारितेतील प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदारांच्या संख्येसह सर्व मतदान केंद्राची यादी असावी.

४. निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्याची सुनिश्चिती करण्यासाठी क्षेत्र अधिकारी आवश्यक असलेले सर्व महत्त्वाचे तपशील जवळ ठेवील.

## क्षेत्र अधिकाऱ्याने पुरवावयाचे साहित्य

**☑ ९.१ काय करावे**

१. क्षेत्राचा तपशीलवार नकाशा.

२. परिसरातील अधिसूचित मतदान केंद्रांची यादी.

३. क्षेत्रामधील अस्तित्वात असलेल्या मतदार मदतकक्षांचा (संपर्क) (हेल्पलाईन) तपशील.

४. नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटी च्या ऊर्जा संचा सह राखीव ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी.

५. क्षेत्राच्या माहितीबाबतच्या व्हीएम-१ (प्रपत्र-१) ची प्रत.

## क्षेत्र अधिकाऱ्याने सादर करावयाचे अहवाल

**☑ १०.१ काय करावे**

१. क्षेत्र अधिकारी, त्यांच्या नियुक्तीनंतर क्षेत्र पोलिस अधिकाऱ्यासह त्यांनी दिलेल्या क्षेत्र भेटीनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला संवेदनशीलतेचे मापन (व्हीएम) अहवाल २ आणि ३ सादर करतील.

२. क्षेत्र अधिकारी मतदान संपल्यानंतर मतदानाच्या दिवसाच्या कामकाजाबद्दल तपशील देणारा अहवाल देखील भारत निवडणूक आयोग त्याच्याद्वारे देण्यात आलेल्या प्रपत्रात सादर करेल. हे अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.



भारत निर्वाचन आयोग

**ELECTION COMMISSION OF INDIA**